मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पुणे ग्रँड टूर स्पर्धेची पिंपरी चिंचवडमध्येही जय्यत तयारी

## पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत जागतिक पातळीवरील सायकलपटूंची 23 जानेवारीला रंगणार स्पर्धा

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगावर ग्लोबल वॉर्मिंगचे संकट असताना सायकल स्पर्धेच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी २३ जानेवारी २०२६ रोजी 'पुणे ग्रँड टूर २०२६' स्पर्धा होत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या २० हून अधिक देशातील उत्कृष्ट सायकलपटू स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यात पिंपरी चिंचवड शहराचाही सहभाग असणार आहे.

स्पर्धेच्या मार्गावरील पिंपरी चिंचवड शहरातील रस्ते दुरुस्ती, खड्डेमुक्ती, बॅरिकेडिंग, पथदिवे दुरुस्ती, वाहतूक व्यवस्थापन यावर विशेष भर दिला जात आहे. या शिवाय सौंदर्यीकरणाच्या कामांना गती देत विविध चौक, रस्ते आणि सार्वजनिक स्थळांवर स्वच्छता मोहीम, रंगरंगोटी आणि हरित उपक्रम राबवले जात आहेत. शहरातील बकालपणा हटविण्यासाठी विशेष पथके नेमून नियमित गस्त सुरू करण्यात आली आहे. पथदिव्यांच्या खांबावरुन टाकलेल्या सेवावाहिन्यांचे एकत्रीकरण केले जात आहे. सायकल चालवताना अडथळा ठरणारे गतीरोधक, उंच गतिरोधक स्लोप तयार करुन गुळगुळीत केले आहेत. रस्त्यातील चेंबर डांबरी रस्त्यासमान करण्यात येत आहेत. त्याची कामे वेगाने सुरू आहेत. धोकादायक गतिरोधके हटवणे, सांडपाणी व पावसाळी वाहिन्यांचे चेंबर रस्त्याला समांतर करणे, रस्त्यांकडेला फुलझाडे व सजावटी दिवे बसवणे, अशी कामे केली जात आहेत.




### स्पर्धेचा मार्ग

» सांगवीतील राजीव गांधी उड्डाणपूल येथून स्पर्धेला सुरुवात होऊन औंध-रावेत बीआरटी मार्ग, डांगे चौक, रावेत, भक्ती-शक्ती चौक, केएसबी चौक, टाटा सर्कल, इंद्रायणी चौक, पीसीएनटीडीए चौक, स्पाईन रोड, केएसबी चौक, एम्पायर इस्टेट चौक, काळेवाडी फाटा, रक्षक चौक मार्गे परत राजीव गांधी उड्डाणपूल येथे समाप्ती होईल. त्याचबरोबर बाणेर, बालेवाडी येथील स्पर्धा देखील शहराच्या काही भागातून जाणार आहे.

> स्पर्धेत ७० ते ८० च्या वेगाने सायकलपटू धावतील. विनाअडथळा ही स्पर्धा पार पाडण्यासाठी स्पर्धेच्या मार्गावर प्रकाशयोजना, स्वच्छता व सायकल चालवण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले जाणार आहे. या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहराचे नाव क्रीडा क्षेत्रात जागतिक नकाशावर कोरले जाईल.
>
> **- बापूसाहेब गायकवाड, सह शहर अभियंता, महापालिका.**

---

# 'पिंपरी चिंचवड वैभव' काव्यसंग्रहाचे बुधवारी प्रकाशन

## साहित्यप्रेमींसाठी खास सोहळा; पिंपरी चिंचवडचा काव्यसंग्रह होणार लोकार्पण

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा आणि मराठी भाषा संवर्धन समिती पिंपरी चिंचवड यांच्या वतीने "पिंपरी चिंचवड वैभव" काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा बुधवारी (दि.३ डिसेंबर) सायंकाळी पाच वाजता, निगडी प्राधिकरण येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे शांता शेळके सभागृह, संत तुकाराम संकुल, (सावली हॉटेल जवळ) येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती या काव्य संग्रहाची संकल्पना मांडणारे ज्येष्ठ साहित्यिक संभाजी बारणे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.




या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, पद्मश्री गिरीश प्रभुणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, संस्थेचे अध्यक्ष व संपादक राजन लाखे आदी उपस्थित राहणार आहेत.

या काव्यसंग्रहात पिंपरी चिंचवड शहरातील प्रमुख स्थळांविषयी जसे की, महासाधू श्री मोरया गोसावी मंदिर, पवित्र इंद्रायणी आणि पवना नदी, भक्ती शक्ती शिल्प, इस्कॉन मंदिर, वैष्णव माता मंदिर, पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी चिंचवड प्राधिकरण, उद्योग नगरी, हिंदुस्थान अँटिबायोटिक कंपनी, टाटा मोटर्स, दुर्गा देवी टेकडी, उद्योग नगरी, साहित्य नगरी, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, गुलाब पुष्प उद्यान, बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय, बर्ड व्हॅली, पिंपरी, चिंचवड, भोसरी गाव, महाराष्ट्र साहित्य परिषद, नाट्य परिषद अशा विविध प्रेक्षणीय व महत्वपूर्ण स्थळांचा गौरव करणाऱ्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास मुक्त प्रवेश असून काव्यप्रेमी नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संभाजी बारणे यांनी केले आहे.

# स्नेहा कलाटे आयोजित ‘खेळ रंगला पैठणी’च्या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## रणजित आबा कलाटे फाउंडेशनच्या कार्यक्रमाने महिलांना दाखवली समाज प्रबोधनाची प्रेरक दिशा : आमदार जगताप



### महा लकी ड्रॉ’ स्पर्धेतील विजेते...

» प्रथम बक्षीस टु – व्हिलर – १) शितल सुभाष गायकवाड, २) सरिता संदीप गावडे, ३) मनिषा रामदास साबळे, ४) माधुरी सोमनाथ लकापते, ५) वर्षा योगेश मोरे,

» द्वितीय बक्षीस एलईडी टीव्ही ४३” – १) वैशाली जंबू वायदंडे, २) शैला सुनील वाघमारे, ३) अनुराधा सचिन बनसोडे, ४) सोनाली संतोष दरेकर, ५) पूजा राजेश जाधव,

» तृतीय बक्षीस वॉशिंग मशीन – १) सरस्वती विलास जानकर, २) आरती संदेश अडागळे, ३) मालन सोमनाथ कस्पटे, ४) उज्वला सुनील चव्हाण, ५) सन्मती महावीर चौघुले,

» चतुर्थ बक्षीस फ्रीज – १) सत्यशीला महादेव लामतुरे, २) अश्विनी संतोष वाघमारे, ३) सारिका संजय आसबे, ४) मनोरमा रमेश येवले, ५) सारिका तुकाराम रोडे,

» पाचवे बक्षीस मिक्सर – १) सविता दिलीप गाडे, २) आशा साहेबराव शेरे, ३) करुणा देविदास पांचाळ, ४) विमल सुहास सोनीमिडीया, ५) उज्वला दत्तात्रय नलावडे या महिलांनी पटकावले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

“प्रभागातील महिलांचा असा उत्स्फूर्त आणि प्रचंड सहभाग पाहून मनापासून आनंद झाला. समाजाच्या एकूण प्रगतीसाठी महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांना सुरक्षित, सक्षम आणि संधींचे समान व्यासपीठ मिळाले पाहिजे. महिला सबलीकरणासाठी महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन आपली क्षमता समाजासमोर मांडावी यासाठीचा रणजित आबा कलाटे फाउंडेशनचा हा कार्यक्रम अगदी स्तुत्य आहे. महिलांचा असा विराट सहभाग म्हणजे समाज प्रबोधनाची प्रेरक दिशा आहे. महिलांचे सामर्थ्य समाजाची खरी शक्ती असून त्यांच्यासाठी सुरक्षित, सक्षम आणि संधीसमृद्ध वातावरण निर्माण करणे ही आपली जबाबदारी आहे, असं प्रतिपादन चिंचवड विधानसभेचे आमदार तथा भाजपा पिंपरी चिंचवड शहर निवडणूक प्रमुख शंकर जगताप यांनी केले.

रणजित आबा कलाटे फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहा रणजित कलाटे यांच्या पुढाकारातुन प्रभाग क्रमांक २६ वाकड, कस्पटे वस्ती, पिंपळे निलख व विशाल नगर या प्रभागातील महिलांसाठी शनिवारी (दि. २९) रोजी “खेळ रंगला पैठणीचा, सन्मान स्त्रीशक्तीचा” या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आमदार शंकर जगताप बोलत होते. या कार्यक्रमात हजारो महिला सहभागी झाल्या होत्या. महिलांच्या या लाभलेल्या या ऐतिहासिक प्रतिसादाची सर्वत्र चर्चा सुरु आहे.

कार्यक्रमात शेकडो महिलांनी पैठणी साड्या, तसेच लकी ड्रॉमधून पाच टू व्हीलर, पाच टीव्ही, पाच फ्रिज, पाच वॉशिंग मशीन व पाच मिक्सर ग्राइंडर अशी लाखो रुपयांची बक्षिसे जिंकली. विजेत्यांना आमदार शंकरभाऊ जगताप, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व जान्हवी किल्लेकर यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले, “महिला सक्षमीकरण हा केवळ कार्यक्रमाचा विषय नाही, तर समाजउभारणीचा मार्ग आहे. प्रभागातील महिलांचा या कार्यक्रमास लाभलेला उत्स्फूर्त सहभाग म्हणजे समाजातील सकारात्मक बदलाचे चिन्ह आहे. महिलांच्या प्रगतीसाठी भाजप सातत्याने प्रयत्नशील आहे.

स्नेहा रणजित कलाटे यांनी सांगितले : “ जमलेला हा महिलांचा समुदाय म्हणजे माझ्या सामाजिक कार्याची पावती आहे. स्त्री अत्याचाराविरुद्ध सर्वांनी एकत्र उभे राहणे गरजेचे आहे. आगामी महापालिका निवडणुकीत संधी मिळाल्यास महिलांच्या शक्तीकरणासाठी, सुरक्षिततेसाठी व आरोग्यासाठी अधिक व्यापक काम करण्याचा माझा संकल्प आहे, असं सांगत कार्यक्रमास उपस्थित सर्व महिला भगिनी व नागरिकांचे आभार मानले”.

# जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

## दिव्यांगांसाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या संस्थांचा तसेच प्राविण्य मिळविणाऱ्या दिव्यांग बांधवांचा होणार सन्मान



> समाज विकास विभागाच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पिंपरी चिंचवड महापालिका दिव्यांग बांधवांना आवश्यक त्या सर्व सुविधा व संधी उपलब्ध करून देणे व समावेशक समाज घडवण्यासाठी प्रयत्नशील आहे. तरी जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे.
>
> **- ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने बुधवार (३ डिसेंबर) रोजी ‘जागतिक दिव्यांग दिन’ साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त समाज विकास विभागाच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांसाठी नवीन योजनांचे उद्घाटन व विविध उपक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सकाळी ११ ते सायंकाळी ७ दरम्यान या कार्यक्रमात दिव्यांगांसाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक संस्था तसेच विशेष प्राविण्य प्राप्त दिव्यांग नागरिक व विद्यार्थी यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांनी दिली.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे आणि दिव्यांग भवन फाउंडेशनच्या सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे व व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख यांच्या अधिपत्याखाली जागतिक दिव्यांग दिनानिमित्त समाज विकास विभागाच्या दिव्यांग भवन फाउंडेशनच्या माध्यमातून चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सकाळी ११ ते सायंकाळी ७ दरम्यान होणार आहे. या कार्यक्रमामध्ये दिव्यांग बांधवांसाठी सकाळी १० ते दुपारी १२ पर्यंत यू.डी.आय.डी. कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड दुरुस्ती केंद्र सुरू राहणार आहे तर दुपारी १२ ते सायंकाळी ७ दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमात दिव्यांगांसाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक संस्था तसेच विशेष प्राविण्य प्राप्त दिव्यांग नागरिक व विद्यार्थी यांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे.

तसेच महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी सुरू करण्यात आलेल्या नवीन योजनांचे उद्घाटन देखील या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. यावेळी दिव्यांग बांधवांना दिव्यांग कल्याणकारी योजना, उद्योग उभारणी आदी विषयांवर मार्गदर्शन देखील करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे यांनी दिली आहे. या कार्यक्रमाला विविध सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, दिव्यांग व्यक्ती व त्यांचे पालक, नागरिक यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन समाज विकास विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बायोमायनिंगसाठी अननुभवी कंपन्यांच्याही निविदा, कचरा डेपोच्या निविदांवर प्रश्नचिन्ह

## देवाची उरुळी कचरा डेपोतील तब्बल 28 लाख मेट्रिक टन जुन्या कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यासाठी पुणे महापालिकेने काढलेल्या पाच स्वतंत्र निविदांना मोठा प्रतिसाद मिळाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

देवाची उरुळी कचरा डेपोतील तब्बल २८ लाख मेट्रिक टन जुन्या कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यासाठी पुणे महापालिकेने काढलेल्या पाच स्वतंत्र निविदांना मोठा प्रतिसाद मिळाला आहे. महापालिकेने मागविलेल्या निविदांमध्ये १८ पैकी ११ कंपन्यांना संबंधित कामाचा अनुभवच नसल्याचे प्राथमिक तपासणीत समोर आले आहे.

या कामासाठी एकूण १८ कंपन्यांनी ३८ प्रस्ताव दाखल केले आहेत. मात्र, यातील तब्बल ११ कंपन्यांकडे बायोमायनिंगच्या कामाचा कोणताही अनुभव नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या निविदांची गुणवत्ता आणि पात्रतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यातील उर्वरित कंपन्यांपैकी काहींवर इतर राज्यांतील प्रकल्पांमध्ये निकृष्ट काम, विलंब किंवा पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन झाल्याने कारवाई झाल्याचेही उघड झाले आहे. परिणामी, निविदेतील अटी शिथिल करून महापालिका नेमके कोणाचे भले करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

एनजीटीच्या आदेशांनुसार, देवाची उरूळी कचरा डेपोतील जुन्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे काम गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. १६३ एकरांहून अधिक क्षेत्रफळ असलेल्या या डेपोत सुमारे 20 लाख टन कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यात आली आहे. यासाठी महापालिकेने मोठ्या प्रमाणात खर्च केला असून, अंदाजे ३० एकर जागा कचरामुक्त करण्यात यश आले आहे. आतापर्यंतच्या निविदांमध्ये कंत्राटदारांची आर्थिक क्षमता, कामाचा अनुभव आणि कचऱ्यातील प्लास्टिक व इतर घातक घटकांपासून आरडीएफ तयार करून त्याची सुरक्षित विल्हेवाट लावणे ही अट लागू होती. या नियमांनुसार भूमी ग्रीन एनर्जी ही कंपनी सध्या प्रतिटन सुमारे ९७० रुपये टिपिंग फीवर बायोमायनिंगची प्रक्रिया करत आहे. देवाची उरुळी कचरा डेपोतील तब्बल २८ लाख मेट्रिक टन जुन्या कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यासाठी पुणे महापालिकेने काढलेल्या पाच स्वतंत्र निविदांना मोठा प्रतिसाद मिळाला आहे.




### प्रत्यक्ष कामाचा अनुभव नाही

**» प्राथमिक तपासणीत असे आढळले की, निविदा भरलेल्या १८ कंपन्यांपैकी तब्बल ११ कंपन्यांकडे बायोमायनिंगचा कोणताही अनुभव नाही. उर्वरित सात कंपन्यांपैकी चार ते पाच कंपन्या फक्त घरगुती कचरा संकलन, विलगीकरण आणि प्राथमिक प्रक्रिया यामध्ये कार्यरत आहेत, परंतु बायोमायनिंगचा प्रत्यक्ष अनुभव कमी आहे. फक्त दोन कंपन्यांनी यापूर्वी अशा प्रकारचे काम केले आहे; परंतु त्यांच्या कामाचा वेग अत्यंत कमी असल्याने आणि प्लास्टिकसारख्या घातक कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावल्याने संबंधित राज्य प्रशासनांनी त्यांच्यावर कारवाई केली आहे. यासंदर्भातील प्रकरण एनजीटीमध्येही प्रलंबित असल्याची माहिती आहे.**

### बांधकाम क्षेत्रातील कंपन्यांना परवानगी

**» महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पदभार स्वीकारल्यानंतर, कचरा प्रक्रिया कामाचा वाढता खर्च कमी करण्यासाठी उर्वरित कचऱ्याच्या बायोमायनिंगसाठी एकाचवेळी पाच निविदा काढण्याचा निर्णय घेतला. महुआच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बांधकाम क्षेत्रातील कंपन्यांनाही या प्रक्रियेत सहभागी होण्याची परवानगी देण्यात आली. तसेच, आरडीएफ निर्मितीची अनिवार्य अटही शिथिल करण्यात आली. प्रतिटन ५७३ रुपयांचा कमी दर निश्चित केल्यामुळे या निविदांना मोठा प्रतिसाद मिळाला. सध्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून या निविदांची तांत्रिक तपासणी सुरू आहे.**

**“ पाच स्वतंत्र बायोमायनिंग निविदांसाठी ३८ प्रस्ताव आले आहेत. महुआच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसारच या निविदा काढण्यात आल्या आहेत. तांत्रिक छाननीनंतर प्रत्यक्ष कामाचा अनुभव नसलेल्या कंपन्या बाद ठरतील. निविदाधारकांना बायोमायनिंगसाठी आवश्यक तंत्रज्ञानाची तसेच प्रक्रियेनंतरच्या उत्पादनांच्या विल्हेवाटीची क्षमता आयुक्तांसमोर सादर करावी लागेल. सर्व बाबींची सखोल तपासणी करूनच निविदा मंजूर केल्या जातील.**

**- - पवनीत कौर, अतिरिक्त महापालिका आयुक्त.**

# मुंढव्यातील रस्त्यांवर योग्य पार्किंग व्यवस्था नसल्याने वाहतूक कोंडीची समस्या; रहिवाशांमध्ये संताप

## मुंढवा येथील बी.जी. शिर्के रोडवर दररोज बेकायदेशीरपणे उभे राहणाऱ्या ट्रकमुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मुंढवा येथील बी.जी. शिर्के रोडवर दररोज बेकायदेशीरपणे उभे राहणाऱ्या ट्रकमुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. परिसरात योग्य पार्किंग व्यवस्था नसल्याने भारत फोर्ज, सारलोहा आणि बी.जी. शिर्के कन्स्ट्रक्शनचे ट्रक सार्वजनिक रस्त्यावरच थांबतात आणि त्यामुळे दिवसभर दुहेरी पार्किंग व ट्रॅफिक जॅमची परिस्थिती कायम राहते.

कंपन्यांकडे परिसराच्या बाहेर पुरेशी पार्किंग व्यवस्था नसल्याने चालकांना गेट पास व अनलोडिंग स्लॉट मिळेपर्यंत सार्वजनिक रस्त्यावरच थांबावे लागते. परिणामी दुहेरी पार्किंग, लांबलचक ट्रक रांगा आणि सतत ट्रॅफिक जॅम अशी स्थिती निर्माण होते.

सदर रस्त्यावर पादचारी मार्गच नसल्याने शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि कार्यालयीन कर्मचारी जीवघेणा प्रवास करतात. प्रचंड आकाराच्या ट्रकांसोबत समांतर चालताना अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्थानिक रहिवासी अमजद खान यांचे म्हणणे आहे की, दुचाकीस्वार आणि पादचारी मार्ग मिळावा यासाठी चालकांशी सातत्याने विनंती करावी लागते. कंपन्यांनी ‘नो पार्किंग’चे फलक लावले असले तरी त्याचा प्रत्यक्ष परिणाम दिसत नाही. ‘सीविक मिरर’ने पाहणी केली असता, नॉन-पीक वेळेतही वाहनांची गर्दी आणि कोंडी सुरूच असल्याचे आढळले.

पार्किंगसंदर्भात स्पष्ट दिशा नसल्याने ट्रक रस्त्यावर थांबतात. सारलोहाच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी सांगितले की, रोज ६० ते ७५ ट्रक आत घेतले जातात. बाहेरील ट्रक हे प्रतीक्षेत असतात. मांजरी भाऊ पार्कजवळ पे-अँड-पार्क सुविधा उपलब्ध असून १५० रुपये शुल्क आकारले जाते. सारलोहाचे फॅक्टरी मॅनेजर आणि एचआर प्रमुख डॉ. अजीत ठाकूर म्हणाले, “रस्त्याचे रुंदीकरण अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. ते पूर्ण झाले तर समस्या मोठ्या प्रमाणात सुटू शकते.”

सामाजिक कार्यकर्ते अभिजीत गायकवाड यांनी सांगितले की, लहानमोठे अपघात नियमित होत असून, विशेषतः शुक्रवारी परिस्थिती अत्यंत गंभीर होते. पोलिसांकडे तक्रारी केल्यानंतर केवळ काही दिवसांसाठी फरक जाणवतो. कंपन्यांनी सार्वजनिक रस्त्यावर पार्किंग न करता जबाबदारी स्वीकारली पाहिजे, अशी त्यांची मागणी आहे.




### पोलिसांचे कारवाईचे आश्वासन

**» या संदर्भात पोलीस उपायुक्त हेमंत जाधव यांनी तातडीने लक्ष देऊन, वाहतूक शाखा आणि कंपनी अधिकाऱ्यांच्या संयुक्त मदतीने कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. तथापि, नागरिकांचे म्हणणे आहे की, पायाभूत सुविधा आणि शिस्तबद्ध पार्किंग व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत हा त्रास कायम राहण्याची शक्यता आहे. आवश्यक उपाययोजना न झाल्यास रास्ता रोको आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.**

# बारामती नगरपरिषद निवडणूक पुढे ढकलली

## 'आणखी 18 दिवस कार्यकर्ते सांभाळताना होणार दमछाक', उमेदवारांच्या खिशाला कात्री!

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती नगरपरिषद निवडणूक सुमारे तीन आठवडे पुढे ढकलल्याने उमेदवारांची चिंता मोठी वाढली आहे. आता आणखी 18 दिवस कार्यकर्ते सांभाळावे लागणार असल्याने उमेदवारांच्या खिशाला चांगलीच कात्री लागणार आहे. याशिवाय स्थानिक राजकारणात मोठ्या उलथापालथी होण्याची चिन्हे आहेत. निवडणूक पुढे गेल्याचा फायदा कोणाला आणि तोटा कोणाला, यावर आता शहरात चर्चा झडू लागल्या आहेत.

यापूर्वीच्या वेळापत्रकानुसार 2 डिसेंबर रोजी मतदान पार पडणार होते. आता ते 20 डिसेंबरला होईल. पालिका निवडणूकीसाठी दि. 17 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस (अ.प.) पक्षाने याच दिवशी आपल्या नगराध्यक्षपदासह अन्य 41 जागी आपले नगरसेवकपदाचे उमेदवार जाहीर केले होते. दि. 21 रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तारखेपर्यंत राष्ट्रवादीच्या आठ जागा बिनविरोध झाल्या होत्या.

अन्य जागांसाठी निवडणूक लागली होती. त्यात काही प्रभागातील जागांबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाली होती. न्यायालयाने त्यामध्ये तीन जागांसंबंधी निकाल दिले. परिणामी प्रभाग 13 ब आणि 17 अ या दोन जागांसाठी नव्याने अर्ज दाखल झाले. परंतु, 15 अ साठी अर्ज दाखल झाला नाही. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी 13 ब व 17 अ या दोन जागा वगळता अन्य ठिकाणचे मतदान पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार 2 डिसेंबर रोजी होणार असल्याचे जाहीर केले होते. आता निवडणूक आयोगाने नैसर्गिक न्याय तत्त्वाचा अवलंब व्हावा यासाठी मतदानाची तारीख बदलली आहे

बारामतीत 21 नोव्हेंबरपासूनच दोन्ही राष्ट्रवादीसह भाजप, शिवसेना, बहुजन समाज पक्ष, वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रीय समाज पक्ष व अन्य अपक्ष आपापला प्रचार करत आहेत. कार्यकर्त्यांना, मतदारांना 10 दिवस सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यात आता आणखी 18 दिवसांची भर पडली आहे. त्यामुळे उमेदवारांसाठी ही निवडणूक कमालीची खर्चीक बनली आहे. तिढा असलेल्या नगराध्यक्ष व अन्य सात जागांच्या उमेदवारांची खर्च मर्यादा वाढणार आहे, अन्य उमेदवारांची खर्च मर्यादा तीच राहणार आहे. त्यामुळे त्यांना आता छुप्या खर्चाने ही कसर भरून काढावी लागणार आहे.



### बाहुबलींसाठी निवडणूक सोपी होण्याची चिन्हे

» काही प्रभागात चुरशीच्या लढती दिसत होत्या. आता तीन आठवड्यांचा वेळ हाती असल्याने तेथील नाराजी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून दूर केली जावू शकते. अन्य ठिकाणी सामावून घेवू, असा शब्द दिला जाऊ शकतो. दुरावलेल्यांना जवळ करण्यासाठी अनेक क्लृप्त्या वापरल्या जाऊ शकतात. परिणामी सर्व प्रकारची ताकद असलेल्या बाहुबलींसाठी ही निवडणूक आता सोपी तर अन्य उमेदवारांसाठी ती अधिकच कठीण होऊन बसली आहे. एकूणच, बारामती नगरपरिषद निवडणूक पुढे गेल्याने राजकीय रंगमंचावर अनपेक्षित उलथापालथ होणार हे निश्चित. याचा कोणाला फायदा आणि कोणाला तोटा हे निवडणुकीच्या अंतिम निकालातच स्पष्ट होईल. परंतु, ज्याचे बळ मोठे त्याला फायदा हे गणित दिसेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### नव्याने नियोजन करावे लागणार

» निवडणूक पुढे गेल्यामुळे आर्थिक गणितातही बदल होणार हे निश्चित. अनेक उमेदवारांनी प्रचारासाठी केलेली तरतूद आता वाढवावी लागणार आहे. त्यामुळे मध्यम व लहान श्रेणीतील उमेदवारांवर अतिरिक्त ताण पडू शकतो. विविध पक्षीय पातळीवर निधी, सभा, पदयात्रा, बूथ रचना यासाठी नव्याने नियोजन करावे लागणार आहे.

### 'ओव्हर कॅम्पेनिंग'

» दि. 21 नोव्हेंबरपासून सुरू झालेली आणि थकवा निर्माण करणारी प्रचार मोहीम आता आणखी वाढणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये दमछाक होण्याची शक्यता आहे. शिवाय मतदारांमध्ये 'ओव्हर कॅम्पेनिंग'मुळे उद्भवू शकणारा कंटाळा देखील काही उमेदवारांना अडचणीत आणू शकतो.

---

# एक कॉल, काम ओके!' सासवडच्या प्रभाग 11 ब मध्ये अजित जगतापांच्या नावाची चर्चा

## सासवड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सासवड शहरात राजकीय तापमान वाढू लागले

**पुणे | प्रतिनिधी**

सासवड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सासवड शहरात राजकीय तापमान वाढू लागले असून प्रभाग क्रमांक 11 ब मधून भारतीय जनता पार्टीकडून नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज करणारे अजित काळुराम जगताप यांनी आपल्या प्रभागातील नागरिकांना विकासाचे निश्चित आश्वासन दिले आहे.

प्रभागातील लाईट, पाणी, ड्रेनेज यांसारख्या मूलभूत सुविधा प्रश्नांना प्राधान्य देत ते माजी आमदार संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली सर्व प्रश्न तत्काळ सोडविण्यास कटिबद्ध असल्याचे नगरसेवक पदासाठी प्रभाग क्रमांक 11 ब मधून उभे असलेले अजित जगताप यांनी सांगितले. दरम्यान, एक कॉल, काम ओके, अशी अजित जगताप यांची ख्याती आहे.

नागरिकांना आवश्यक असलेला वेळ देणे, त्यांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेणे आणि त्यावर तत्काळ उपाययोजना करणे हेच आपल्या कामाचे ब्रीद असल्याचे ते म्हणाले. प्रभागातील प्रत्येक घरापर्यंत सुविधा पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे. माजी आमदार संजय जगताप नेतृत्वात आम्ही मजबुतीने उभे राहून विकासाला गती देऊ, असा विश्वास अजित जगताप यांनी व्यक्त केला.

ते म्हणाले, भाजपकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार आनंदीकाकी जगताप यांच्यासह आपल्या पॅनलमधील सर्व नगरसेवक उमेदवारांना भरघोस मतदान करून विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले. एकदिलाने मतदान करून स्थिर, सक्षम व विकासाभिमुख नेतृत्व घडविणे हे आता सासवडकरांच्या हातात आहे.

भाजप पॅनलमधील नगरसेवक उमेदवारांमध्ये सारिका हिवरकर, मनोहर जगताप, लीना वढणे, दिनेश भिंताडे, शितल भोंडे, ज्ञानेश्वर जगताप, सोपान रणपिसे, स्मिता जगताप, मोनिका म्हेत्रे, मयुर चौखंडे, अर्चना जगताप, राजन जगताप, स्मिता जगताप, प्रवीण पवार, सुहास लांडगे, सुमाली राऊत, प्रदीप राऊत, प्रियंका जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, दीप्ती सूर्यवंशी यांचा समावेश आहे. सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून देऊन प्रभागाचा आणि सासवड शहराचा सर्वांगीण विकास साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.



### प्रभाग 11 ब मध्ये आश्वासक हाक

» निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसा प्रचाराला वेग येत असून नागरिकांकडूनही विविध पक्षांच्या उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे. प्रभाग 11 ब मध्ये विकासाच्या आश्वासनांसह बदलाची हाक देणारा हा भाजपचा प्रचार नागरिकांच्या प्रतिसादाने अधिक गती घेईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.